**मुख्यमंत्री महा-आरोग्य कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याची कार्यपद्धती:**

**संदर्भ :**

१. शासन निर्णय क्र. कौविउ-२०२१/प्र.क्र.४८/कौशल्य-१, दि. १९ मे, २०२१.

२. शासन निर्णय क्र. कौविउ-२०२१/प्र.क्र.४८/कौशल्य-१, दि. ०२ सप्टेंबर, २०१५.

आरोग्य व वैद्यकीय क्षेत्रामध्ये साथीच्या रोगाशी संबंधित उद्भवलेल्या परिस्थितीत कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावे तसेच या क्षेत्रातील संसाधनांमधील आवश्यक प्रशिक्षित मनुष्यबळाचा तुटवडा दूर व्हावा, याकरिता आरोग्य क्षेत्रात काम करण्यास इच्छुक असलेल्या राज्यातील १८ ते ४५ वयोगटातील युवक/युवतींना हेल्थकेअर, पॅरामेडीकल आणि नर्सिंग, व डोमेस्टिक वर्कर क्षेत्रांमध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण प्रदान करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्यामध्ये प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान PMKUVA अंतर्गत मुख्यमंत्री महाआरोग्य कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यास मान्यता देण्यात आली असून सदर कार्यक्रम राबविण्याची कार्यपद्धती खालीलप्रमाणे आहे.

१) प्रशिक्षण लक्ष्य:

मुख्यमंत्री महाआरोग्य कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत राज्यात सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात एकूण २०००० उमेदवारांना हेल्थकेअर, पॅरामेडीकल आणि नर्सिंग, व डोमेस्टिक वर्कर या क्षेत्रांमध्ये प्रशिक्षण देण्याचे लक्ष्य घेण्यात आले असून जिल्हानिहाय प्रशिक्षणाचे लक्ष्य सोबत परिशिष्ट-१ मध्ये जोडण्यात आले आहे.

२) अभ्यासक्रम:

मुख्यमंत्री महाआरोग्य कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमासाठी हेल्थकेअर, पॅरामेडीकल आणि नर्सिंग, व डोमेस्टिक वर्कर या क्षेत्रांमध्ये प्रशिक्षण देण्यात यावे. सदर क्षेत्रांतर्गत असणारे विविध कोर्सेस आणि त्यासाठी आवश्यक पात्रता याची विस्तृत माहिती सोबत परिशिष्ट-२ मध्ये जोडली आहे .

३) मागणी एकत्रीकरण:

सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांनी सद्यस्थितीत संबंधित जिल्ह्यात आरोग्य क्षेत्रात आवश्यक मनुष्यबळाची माहिती आरोग्य विभागातील संबंधित अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून दि.२९ मे,२०२१ पर्यंत एकत्रित करून आवश्यक अभ्याक्रमाची निवड करावी. सदर माहिती एकत्रित करण्याकरिता खालील गुगल फॉर्ममध्ये भरण्यात यावी. https://docs.google.com/forms/d/17Uvcm0YKn7ebbJSrmlz5L_3a7UQ8tDnX7Rs1GEHWtl4/edit

४) प्रशिक्षण संस्थांची निवड:

I. निवड केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे राज्यातील सर्व शासकीय इस्पितळे तसेच वैद्यकीय शिक्षण संस्था यांना ग्रीन चॅनेलद्वारे (नोंदणी आणि सूचीबद्धता शुल्कामध्ये सूट) व्यावसायिक प्रशिक्षण संस्था म्हणून (VTI) नोंदणी करण्याकरिता सर्व जिल्हा व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण अधिकारी व सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र किंवा

त्यांचे प्रतिनिधी यांनी संबंधित जिल्ह्यातील सर्व शासकीय इस्पितळे, खाजगी इस्पितळांमध्ये २० पेक्षा अधिक बेड्स आहेत असे इस्पितळे व वैद्यकीय शैक्षणिक संस्था यांची भेट घेऊन संबंधितांना प्रशिक्षण कार्यक्रम, आवश्यक मनुष्यबळ, त्याबाबतचा अभ्यासक्रम व नोंदणी प्रक्रीयेबाबत अवगत करणे. सदर इस्पितळे व वैद्यकीय संस्थांची दि.३१ मे,२०२१ पर्यंत माहिती एकत्रित करण्याकरिता खालील गुगल फॉर्ममध्ये भरण्यात यावी.

https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSeEqG821O5qx7XUd8bNd78aZPtaXNaMmd-RrOypBUYBeZnE-g/viewform?usp=sf_link

II. सदर इस्पितळे व वैद्यकीय शैक्षणिक संस्था यांच्याकडे प्रशिक्षणाकरिता आवश्यक पायभूत सुविधा उपलब्ध असल्याने त्याबाबत तपासणीची गरज नसून याकरिता संस्थांना नोंदणी व इतर शुल्कात सूट देण्यात आली आहे.

III. जिल्हा व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण अधिकारी यांनी सदर इस्पितळे व वैद्यकीय शैक्षणिक संस्था यांची व्यावसायिक प्रशिक्षण संस्था (VTI) म्हणून ग्रीन चॅनेल द्वारे दि.१० जून,२०२१ पर्यंत नोंदणी करणे. व्यावसायिक प्रशिक्षण संस्था (VTI) सूचीबद्ध करण्याची कार्यपद्धती महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण मंडळामार्फत संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात यावी.

IV. व्यावसायिक प्रशिक्षण संस्था (VTI) म्हणून नोंद झालेल्या प्रशिक्षण संस्थांची यादी संबंधित जिल्हा व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण अधिकारी यांनी सदर जिल्ह्याच्या सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांना वेळोवेळी सादर करावी. सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र महास्वयंम पोर्टलवर Vocational Training Partner (VTP) ग्रीन चॅनेल द्वारे दि.१३ जून,२०२१ पर्यंत नोंदणी पूर्ण करणे.

V. काही जिल्ह्यांमध्ये प्रशिक्षण संस्थांची कमतरता असेल तर दि.१४ जून,२०२१ रोजी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी मार्फत प्रशिक्षण संस्था निवडीचा EOI प्रसिद्ध करण्याबद्दल निर्णय घेण्यात येईल तद्नंतर आवश्यक प्रशिक्षण संस्थांच्या आधारे दि.२० जून,२०२१ पर्यंत EOI प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानुसार EOI द्वारे निवड केलेल्या संस्थांमार्फत प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात यावा.

VI. तसेच, काही जिल्ह्यामध्ये सूचीबद्ध होणाऱ्या इच्छुक प्रशिक्षण संस्थांची संख्या संबंधित जिल्ह्याला देण्यात येणाऱ्या उद्दिष्टांपेक्षा अधिक असल्यास ज्या इस्पितळांची (प्रशिक्षण संस्थेची) प्रशिक्षित मनुष्यबळ त्याच इस्पितळामध्ये रोजगार देऊन सामावून घेण्याची क्षमता जास्तीत जास्त आहे व कोव्हीड-१९ उपचार करण्याकरिताचे आवश्यक मनुष्यबळ असलेल्या इस्पितळांना प्राधान्य देण्यात यावे.

५) उमेदवारांची जमवाजमव व समुपदेशन:

I. सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांनी उमेदवारांची जमवाजमव व समुपदेशन करणे. जिल्ह्याला देण्यात आलेल्या एकूण लक्ष्याच्या कमाल १०% अधिकचे उमेदवार नोंदणी करण्यास मुभा आहे.

II. जिल्हा कौशल्य रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व आरोग्य विभाग यांनी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचा प्रचार आणि प्रसार करून राज्यातील युवक/युवतींना रोजगाराच्या संधी मिळणेबाबत प्रोत्साहित करणे.

III. सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांनी उमेदवारांची निवड करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने मेळावे आयोजित करणे.

IV. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीच्या महास्वयंम पोर्टलवर उमेदवारांची ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली असून सोसायटीमार्फत जिल्हानिहाय नोंदणी करण्यात आलेली माहिती संबंधित जिल्ह्यास सादर करण्यात यावी.

V. निवड केलेल्या प्रशिक्षण संस्थांमार्फत उमेदवारांची जमवाजमव करणे.

VI. सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांनी नोंदणी केलेल्या उमेदवारांचे कौशल्यपूर्व मार्गदर्शन व समुपदेशन ३ टप्प्यात (इच्छुक उमेदवारांचे समुपदेशन, नोंदणी पूर्व समुपदेशन आणि प्रशिक्षण सुरु झाल्यानंतर समुपदेशन) करणे.

६) कार्यादेश आणि प्रशिक्षण तुकडीस मान्यता:

I. प्रशिक्षण तुकडीमध्ये उमेदवारांची संख्या किमान २० व कमाल ३० असावी, तसेच विशेष बाब म्हणून या योजनेकरिता उमेदवारांची किमान संख्या ५ करण्याची मुभा आहे .

II. निवड केलेल्या प्रशिक्षण संस्थांना कार्यादेश सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र मार्फत देण्यात यावे.

III. सदर कार्यादेशाप्रमाणे महास्वयंम पोर्टल वर सादर केलेल्या प्रशिक्षण तुकड्यांना महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी मार्फत मान्यता Training Batch Number (TBN) देण्यात येईल.

७) प्रशिक्षण:

प्रशिक्षण खर्च प्रतिपूर्ती खालीलप्रमाणे २ मॉडेलपैकी आपल्या जिल्ह्यातील मागणी आधारित अभ्यासक्रम विचारात घेता योग्य ते मॉडेल निवडून रोजगार / स्वयंरोजगार बाबत कार्यवाही करण्यात यावी:

१. सर्वसाधारण कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत नमूद पद्धतीप्रमाणे प्रशिक्षण कालावधी, उमेदवार संख्या व कॉमन कॉस्ट नॉर्म्सनुसार प्रती तास प्रशिक्षण खर्च यावर आधारित टप्पानिहाय प्रशिक्षण खर्च प्रतिपूर्ती प्रमाणे प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे.
किंवा

२. नॅशनल ॲपरेंटीस प्रमोशन स्कीममधील खालील नमूद अभ्यासक्रमाकरिता इच्छुक संस्थांमार्फत प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे.
अभ्यासक्रम:

| अ.क्र. | अभ्यासक्रम | कोर्स कोड |
|---|---|---|
| १ | General Duty Assistant – Advanced | CO०१२००००४३ |

८) प्रशिक्षणाची कार्यवाही:

I. सदर प्रशिक्षण On Job Training तत्वावर राबविण्यात यावे .

II. क्लास रूम प्रशिक्षण खाली नमूद एका पर्यायाप्रमाणे देण्यात यावे.

अ. एकूण प्रशिक्षण कालावधीतील थेअरीचा भाग पहिल्या सत्रात क्लास रूम प्रशिक्षण घेण्यात यावे व उर्वरित प्रशिक्षण On Job Training पद्धतीने घेण्यात यावे.

किंवा

आ. सदर प्रशिक्षण कालावधीत दिवसातील पहिले ३ तास क्लास रूम प्रशिक्षण घेण्यात यावे व उर्वरित प्रशिक्षण On Job Training पद्धतीने घेण्यात यावे.

III. प्रशिक्षण संस्थेस क्लास रूम प्रशिक्षण Online पद्धतीने घेण्यास मुभा असेल, याकरिता संबधित प्रशिक्षण संस्थेने Online पद्धतीने घेण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमाची विभागणी सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांना सादर करावी. सदर विभागणीस सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतरच प्रशिक्षण तुकडी सुरु करावी.

IV. प्रशिक्षण तुकडीमधील उमेदवारांची दैनंदिन हजेरी Face Recognition- Duty Par App वर नोंदविणे.

किंवा

फक्त इस्पितळांकरीता दैनदिन हजेरी नोंदणी पुस्तकात घेऊन सदर हजेरीस संबंधित प्रशिक्षण संस्थेने नेमणूक केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्यांची मान्यता घेणे. तसेच सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांनी संबधित प्रशिक्षण संस्थेस वेळोवेळी भेट देऊन सदर हजेरी सत्यापित करावी. तद्नंतर संबंधित प्रशिक्षण संस्थांनी सदर हजेरी smo3a@mssds.in या ईमेल आयडी वर सोसायटीस सादर करणे. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीकडे प्राप्त हजेरीची पडताळणी करून महास्वयंम पोर्टलवर अपलोड करण्यात येईल.

VII प्रत्येक अभ्याक्रमाचा कालावधी हा त्या प्रशिक्षण अभ्यासक्रमावर अवलंबून असेल.

V. प्रशिक्षण संस्थांकडून प्रशिक्षणाची तुकडी अभ्याक्रमाच्या कालावधीनुसार विहित कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक आहे.

९) मूल्यांकन व प्रमाणपत्र :

I. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार मूल्यांकन करणे. NSQF संलग्नित अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षण तुकड्यांचे मूल्यांकन MSCVT/ SSC मार्फत करण्यात येईल. तसेच MSCVT मार्फत मान्यता देण्यात आलेल्या Non- NSQF अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षण तुकड्यांचे मूल्यांकन MSCVT मार्फत करण्यात येईल तथापि Non- NSQF अभ्यासक्रमाची प्रशिक्षण तुकडी सुरु करण्यापूर्वी सोसायटीची पूर्व मान्यता घेणे बंधनकारक आहे.

II. प्रशिक्षणांती उमेदवारांचे मूल्यांकन MSCVT मार्फत संबंधित इस्पितळांचे किंवा संबंधित वैद्यकीय शिक्षण संस्थेचे डॉक्टर्स कडून करून घेण्यास मुभा असेल .

III. यशस्वीरीत्या प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या उमेदवारांनी निवड केलेल्या अभ्यासक्रमानुसार MSCVT/SCC यांचे मार्फत प्रमाणपत्र देण्यात येईल.

१०) प्रशिक्षणोत्तर कार्यवाही:

I. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागीय आयुक्तालय तसेच महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांच्या प्रतिनिधींनी

प्रशिक्षण सुरु असलेल्या प्रशिक्षण केंद्रे तसेच सदर लाभार्थी रोजगार किंवा स्वयंरोजगार करत असलेल्या ठिकाणी अचानक भेटी देऊन प्रशिक्षण कार्यक्रमाची गुणवत्ता तपासणी करून उचित कार्यवाही करावी.

II. प्रमाणित झालेल्या प्रशिक्षणार्थी उमेदवारांची माहिती महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत आरोग्य विभागास उपलब्ध करून देण्यात येईल.

११) देयके अदा करण्याच्या अटी:

प्रशिक्षण शुल्क प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता विकास अभियान (PMKUVA) योजनेतील सद्यस्थितीतील खालील नमूद अटींप्रमाणे, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी मार्फत अदा करण्यात येईल.

| **अ.क्र.** | **प्रशिक्षण खर्चाच्या प्रतीपूर्तीचे टप्पे** | **प्रतीपुर्तीचे टप्पे** |
|---|---|---|
| १ | प्रशिक्षण सुरु झाल्यावर ७ दिवसांचे आंत (प्रशिक्षनार्थ्यांच्या पहिल्या आठवड्यातील महत्तम उपस्थितीच्या आधारे) | ३०% |
| २ | प्रशिक्षण संपल्यानंतर (मूल्यमापन व प्रमाणीकरणाअंती) | ३०% |
| ३ | यशस्वी उमेदवारांपैकी किमान ७५% उमेदवारांना रोजगार/स्वयंरोजगार प्राप्त झाल्यानंतर (नोकरी प्राप्त झाल्यापासून / स्वयंरोजगार मिळून ३ महिन्यानंतर विहित कागदपत्रे/ पुरावे सादर करणे आवश्यक) | २०% |
| ४ | उमेदवारांना ६ महिन्यापर्यंत रोजगार/ स्वयंरोजगार उपलब्ध झाल्याबाबत विहित कागदपत्रे/पुरावे सादर केल्यावर आणि त्याचे मूल्यमापन फॉर्म MSSDS यांना पोर्टलद्वारे प्राप्त झाल्यानंतर | २०% |

प्रशिक्षण कार्यक्रमाचे टप्पेनिहाय प्रशिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती संबंधित प्रशिक्षण संस्थेच्या (इस्पितळ) यांनी महास्वयंम पोर्टलवर सादर केलेल्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येईल.

१२) प्रशिक्षणाचा खर्च:

I. प्रकल्पासाठी येणाऱ्या एकूण खर्चाचे अंदाजपत्रक कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागाने निर्गमित केलेल्या सामान्य खर्च नियमांच्या (कॉमन कॉस्ट नॉर्म्स) आधारावर करण्यात येतील. केंद्र शासनाच्या कॉमन कॉस्ट नॉर्म्स संदर्भातील पत्र सोबत परिशिष्ट-३ मध्ये जोडण्यात आले आहे.

II. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता आवश्यक निधी प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीमधून उपलब्ध करून देण्यात येईल.

***